

नमस्कार! मी महेश. दारोदारी कचरा गोळा करण्याचे काम करणाऱ्या नगरपालिकेच्या ठेकेदाराकडे, मी आणि माझी पत्नी लीला काम करतो. मला माहीत आहे, आपल्यापैकी अनेकजण कोविड 19 महामारीच्या काळात नागरिकांची सेवा करीत आहेत. करोना व्हायरसपासून तुमचे संरक्षण होण्यासाठी आवश्यक संरक्षक सूचना मी आपल्याला सांगू इच्छितो.

**विशेष नोंध : या सूचना, या नियमित कार्यपद्धतीचा भाग नसून केवळ सफाई कामगारांनी कोविड 19 महामारीच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती अतिरिक्त काळजी घ्यावी याकडे लक्ष वेधण्यासाठी आहेत.**

## आपल्या घरातून कामावर जाण्यापूर्वी या गोष्टी आवर्जून करा-



**1. आपले शरीर पूर्ण झाकले जाईल असे कपडे वापरा**



**2. जर आपल्याला जखम झाली असेल तर त्यावर जलरोधक पट्टी लावा**



**3. पालिकेने दिलेला अत्यावश्यक सेवकाचा पास आपल्याजवळ ठेवा**



**4. हात धुण्यासाठी साबण आणि पाणी तुमच्याबरोबर ठेवा**



**5. हातमोजे, मास्क, एप्रेन, बूट या वैयक्तिक सुरक्षा साधनांचा (PPE) वापर करा** (जेथे मास्क उपलब्ध नसेल तेथे दोन तीन थरांच्या स्वच्छ कपड्याने नाक व तोंड झाकून घ्या)



**6. कपड्यांची अतिरिक्त जोडी आपल्या बरोबर राहुद्या**

## कामाच्या ठिकाणी गेल्यावर या गोष्टी नक्की कराच-



**1. हात साबणाने किमान 20 सेकंद धुवा**

**2. अनावश्यक वस्तूना स्पर्श करणे टाळा**






**3. हातमोजे, मास्क, एप्रेन, बूट या वैयक्तिक सुरक्षा साधनांचा (PPE) वापर करा**

**4. चेहरा, नाक, डोळे यांना स्पर्श करू नका**






**5. कामाचा भाग म्हणून प्रवास करताना सहकाऱ्यापासून सुरक्षित अंतर ठेवा**

## कामाला सुरुवात करताना खालील पद्धतीचा वापर करा-



**1. दरवाजा उघण्यासाठी घंटेचा वापर करा**



**2. इतरांपासून किमान 4 फूट अंतर राहील याची दक्षता घ्या**



**3. नागरिकांना कचरा थेट कचरागाडीत किंवा ढकलगाडीत टाकायला सांगा**



**4. कचरापेटीस स्पर्श करू नका, उघड्या हाताने कचरा घेऊ नका**




**5. पालिकेच्या आदेशाशिवाय विलगीकरण केलेल्या घरातून कचरा गोळा करू नका**



**6. वापरलेले मास्क आणि हातमोजे, नागरिकांना वेगळ्या पिशवीत टाकायला सांगा**




**7. कचरा उचलण्यासाठी कागद किंवा सुपाचा वापर करा**



**8. कचरा अधिक काळजीपूर्वक हाताळा, आईस्क्रीम स्टिक सारख्या कचऱ्यात लाळ असू शकते**

## कार्यालयात काम संपवून परत गेल्यावर-



**वैयक्तिक सुरक्षा साधने काढा**



**हात, चेहरा स्वच्छ धुवा**



**वापरलेले कपडे बदलून बॅगमध्ये ठेवा**



**नवीन कपडे घालून, घरी जाण्याचा मास्क घाला**





**घरी गेल्यावर सर्वप्रथम सुरक्षा साधने, वापरलेले कपडे स्वच्छ धुवून कोरड्या जागी वाळत टाका नंतरच कुटुंबियांना भेटा**

**सर्दी, ताप, खोकल्यासारखी लक्षणे आढळल्यास ताबडतोब वैद्यकीय सल्ला घ्या**

**कोरोना व्हायरस वर लढाईत, आपण सुरक्षित राहून विजय मिळवूया**

Safety and Dignity to Sanitation Work |Urban Management Centre with support from BMGF | manvita@umcasia.org